एक धाव महिलांच्या सन्मानासाठी

खारघर मॅरेथॉनला उदंड प्रतिसाद

पनवेल :

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि पनवेल मॅरेथॉन कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २) झालेल्या खारघर मॅरेथॉन २०१४ मध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग दर्शवून उदंड प्रतिसाद दिला. 'एक धाव महिलांच्या सन्मानासाठी' असे घोषवाक्य असलेल्या या स्पर्धेतील राज्यस्तरीय पुरुष गटात शंदर सिंग (पुणे) आणि महिला गटात नीलम कदम–राजपूत (उरण) विजेते ठरले. वेगवेगळ्या १२ गटांत झालेल्या या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करून गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, हल्ली प्रत्येक क्षेत्रात मुली, महिला प्रगती करीत आहेत. त्यांना उचित मान–सन्मान मिळालाच पाहिजे. त्याची सुरुवात प्रत्येकाने स्वत:च्या घरापासून केली पाहिजे.

आई, बहिण, पत्नी, मुलगी अशा विविध रूपांत असलेला नारी वर्ग घराचा केंद्रबिंदू असतो. त्यांना देवीचा दर्जा नाही दिला तरी चालेल, पण दासी बनवू नका, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी निक्षून सांगितले.

दिल्लीत चालत्या बसमध्ये झालेल्या तरुणीवरील सामूहिक अत्याचारानंतर देश एकवटला, निदर्शने झाली. त्यामुळे घरच्या कर्त्या माणसाला असुरक्षिततेची भावना वाटत असते. त्यांनी मुली, महिलांचा सन्मान करण्याची शिकवण आपल्या मुलाला दिली पाहिजे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केले. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या पुढाकारामुळे महिलांना राजकीय क्षेत्रात ५० टक्के आरक्षण मिळाले आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

वाहतूक पोलीस विभागाचे उपायुक्त विजय पाटील म्हणाले की, नवी मुंबईत अनेक मॅरेथॉन पाहिल्या, पण श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि पनवेल मॅरेथॉन कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणारी नियोजनबद्ध स्पर्धा मी पाहिलेली नाही. विशेष म्हणजे या मॅरेथॉनद्वारे समाजासाठी चांगला संदेश दिला जातोय. ही मॅरेथॉन भविष्यात मुंबई मॅरेथॉनलाही मागे टाकेल.

या बक्षीस वितरण समारंभास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रमोद शेवाळे, खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सूर्यकांत जगदाळे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष आर. सी. घरत, ज्येष्ठ नेते श्याम म्हात्रे, उपाध्यक्ष जी. आर. पाटील, सरचिटणीस डॉ. भक्तीकुमार दवे,  इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, काँग्रेसचे पनवेल तालुका अध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, कार्याध्यक्ष अरुणशेठ भगत, नगराध्यक्षा चारुशीला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, रायगड जिल्हा परिषदेतील काँग्रेसचे प्रतोद राजेंद्र पाटील, युवक काँग्रेसचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे अध्यक्ष सुदाम पाटील, युवा नेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते शशिकांत बांदोडकर, वाय. टी. देशमुख, महिला काँग्रेसच्या पनवेल तालुका कार्याध्यक्षा व गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्षा वर्षा नाईक, कार्याध्यक्षा सुहासिनी शिवणेकर, ग्राहक हित कक्षच्या तालुका अध्यक्षा दर्शना भोईर, काँग्रेसचे उरण तालुका अध्यक्ष मिलिंद पाडगावकर, शहर अध्यक्ष गणेश सेवक, मत्स सेलचे जिल्हाध्यक्ष मार्तंड नाखवा, पनवेल शहर कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, पनवेल पालिकेतील काँग्रेसचे गटनेते अनिल भगत, बांधकाम सभापती राजू सोनी, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, महिला व बालकल्याण सभापती नीता माळी, मागासवर्गीय जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश बिनेदार, स्पर्धेचे मुख्य प्रायोजक मोनार्क ग्रुपचे हसमुख ठाकूर, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त टेबल टेनिसपटू संजय कडू, मॅरेथॉनच्या निरीक्षक गीता भोळे, विनोद पाटील, तसेच वसंत काठावले, प्रभाकर जोशी, अनंता तोडेकर, शिवाजी दुर्गे, नाना घरत, श्रावण घरत आदींसह आजी–माजी नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार काँग्रेसचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.